

संस्कृत साहित्य सरिता

महावीरचरित

संस्कृत
साहित्य
सरिता
: ६

भवभूति-कृत

महावीरचरित

कथासार
अमरेन्द्र

वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किमत सहा आणे
पहिली आवृत्ती । १९५६

मुद्रक ।
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. ' संस्कृत-साहित्य-सरिता ' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

परिचय

भवभूतीनें तीन नाटकें लिहिलीं—'मालती माधव', 'महावीरचरित' आणि 'उत्तररामचरित'. यांपैकीं पहिलें शृंगाररसाचें, दुसरें वीररसाचें व तिसरें करुण-रसाचें, असें सामान्यतः म्हणतां येईल. पहिल्याचें कथानक सामाजिक आहे, तर पुढचीं दोन्ही रामायणाच्या कथेवर आधारलेलीं आहेत. मात्र कवीनें आपल्या उद्देशांसाठीं त्या मूळ कथेंत हवे ते व हवे तसे फेरफार करून घेतले आहेत. हे फेरफार नाटकांतील रसपरिपोषाच्या दृष्टीनें इष्ट असले तरी कांहीं ठिकाणीं कवीच्या स्वतःच्या काळांतील समाजस्थितीहि त्यानें त्यांत घुसडली आहे.

रामायणाच्या कथेप्रमाणें राम वनांत गेले ते अयोध्येहून पण येथें भवभूतीनें तो प्रसंग मिथिलेंत घडवून आणला आहे. तसेंच रामवनवास या रामायणांतील मुख्य घटनेची जबाबदारी त्यानें रावणाचा आजा माल्यवान याच्या कारस्थानीपणावर टाकली आहे!

भवभूतीचा काळ आठव्या शतकांतला मानला जातो. पद्मपुरांत (वऱ्हाड) जन्मलेल्या या थोर कवीला राजाश्रय लाभला नव्हता, किंबहुना तो स्वतः एक प्रकारचा 'बंडखोर' होता, असेंहि दिसतें. तथापि त्याची गणना महाकवींतच केली जाते; आणि तें अगदीं यथायोग्य आहे, हें त्याचें प्रस्तुत नाटक वाचून कोणालाहि पटेल.

—लेखक

महावीरचरित

महर्षि विश्वामित्रांचा आश्रम कौशिकी नदीच्या कांठीं वसलेला होता. आसपासची हिरवीगार वनश्री सौंदर्यानें नटल्यामुळें मोठी रमणीय वाटत होती. विश्वामित्रांच्या या आश्रमाचें 'सिद्धाश्रम' हें नांवहि अगदीं सार्थ होतें. विश्वामित्रांनीं या आश्रमांत यज्ञाची सर्व सिद्धता केली होती. यज्ञाच्या रक्षणाच्या निमित्तानें ते बालवयाच्या राम-लक्ष्मणांना अयोध्येहून घेऊन आले होते. त्यांच्या मनांत होतें कीं रामाला जनककन्या सीतेची प्राप्ति व्हावी आणि रामाच्या हातून रावणकुलाचा नाश व्हावा. खरें म्हणजे या हेतूनेंच त्यांनीं त्या बालवीरांना तेथें आणलें होतें. सिद्धाश्रमांतील या यज्ञासाठीं विश्वामित्रांनीं मिथिलेच्या जनक राजालाहि बोलावणें पाठविलें होतें. परंतु स्वतः जनकानें यज्ञाची दीक्षा घेतली असल्यामुळें त्यानें आपला भाऊ कुशध्वज याला धाडून दिलें. आणि विश्वामित्रांच्याच सूचनेवरून त्यानें कुशध्वजाबरोबर सीता आणि उर्मिला यांनाहि यज्ञमहोत्सव पाहण्यासाठीं पाठविलें.

कुशध्वजाचा रथ सिद्धाश्रमापाशीं येऊन पोहोंचतांच त्यानें आपलें सैन्य मागें ठेवलें व दोघी पुतण्यांसह तो आश्रमांत निघाला. तोंच स्वतः विश्वामित्र त्यांना सामोरा आले. विश्वामित्रांनीं यावेळीं राम व लक्ष्मण यांनाहि आपल्याबरोबर घेतलें होतें. साहजिकच विश्वामित्रांनीं त्या दोघांना नवीन पाहुण्यांचा परिचय करून दिला.

विश्वामित्रांपाशीं येतांच प्रथम कुशध्वज राजानें व नंतर त्या राजकुमारींनीं नमस्कार केला. "यज्ञासाठीं जमीन नांगरतांना सांपडलेली ही कन्या सीता आणि ही दुसरी जनकाचीच मुलगी उर्मिला." कुशध्वजानें विश्वामित्र ऋषींना त्यांची ओळख करून दिली. रामाला सीतेच्या उत्पत्तीची ही अद्‌भुत हकीकत ऐकून आणि तिचें रूप-गुण पाहून तिच्याविषयीं प्रेम उत्पन्न झालें. राम-लक्ष्मणांना पाहिल्याबरोबर सीता व उर्मिला यांच्याहि मनांत त्यांच्या-विषयीं अतिशय आदर व प्रेम निर्माण झालें होतेंच.

त्या काळच्या पद्धतीप्रमाणें आश्रमांत प्रवेश करण्यापूर्वीं सर्वजण विकंतक वृक्षाच्या छायेंत थोडा वेळ विश्रांति घेत बसलीं. तोंच कोणीतरी रामाचा जयजयकार करीत असल्याचें त्यांच्या कानावर पडलें. "जय जय जगदीश रामचन्द्र जय." सर्वजण आश्चर्यानें तिकडे पाहूं लागलीं. हा आवाज कोणा स्त्रीचा होता, पण ती कोण होती तें समजत नव्हतें. तेव्हां विश्वामित्रांनीं सांगितलें कीं, ही गौतम ऋषीची पत्नी अहल्या. हिला पापाचरणामुळें पतीचा शाप झाला होता. रामाच्या प्रभावानें ती आज शापांतून मुक्त झाली आहे.

रामाच्या सौंदर्यानें सीता अगोदरच आनंदली होती. आतां त्याच्या थोरपणाचा नवा पुरावा तिला पाहावयाला मिळाला. त्यामुळें तर तिच्या मनावर फारच परिणाम झाला. कुशध्वजालाहि रामाच्या अंगचें तें सहज व अलौकिक सामर्थ्य पाहून आश्चर्य वाटलें आणि आनंदहि झाला.

त्याच्या मनांत येऊन गेलें कीं राम-सीतेचा विवाह घडवून आणतां आला तर किती छान होईल! परंतु सीतेच्या स्वयंवरासाठीं जनकानें एक मोठा कठिण पण लावलेला होता त्याची कुशध्वजाला आठवण होऊन तो खिन्न झाला. कारण त्या पणाप्रमाणें जनकाजवळ असलेल्या त्या प्रचंड शिवधनुष्याला दोरी लावण्याचें या लहानग्या रामाला कसें जमणार, अशी त्याला शंका आली.

याच वेळीं रावणाचा पुरोहित सर्वमाया हा तेथें येऊन ठेपला. सर्वमाया हा एक म्हातारा राक्षस असून तो रावणाकडून सीतेला मागणी घालण्याकरितां आला होता. वास्तविक सीतेला जबरदस्तीनें पळवून न्यावी असेंच रावणाच्या मनांत होतें, परंतु त्याचा आजा माल्यवान यानें त्याला तसें न करण्याबद्दल बजावलें. म्हणून त्यानें सामोपचारानें सीतेला मागणी घालण्याकरितां या म्हाताऱ्या पुरोहिताला मिथिलेला पाठविलें होतें. परंतु तेथें जनक राजा यज्ञांत गुंतला असल्यामुळें त्यानें सर्वमायाला सिद्धाश्रमांत जाऊन विश्वामित्र व कुशध्वज यांची भेट घेण्यास सांगितलें.

रावणाचा पुरोहित सर्वमाया राक्षस भेटीला आला असल्याचें एका तापसानें येऊन सांगितलें. राक्षसाचें नांव ऐकतांच त्या मुली थोड्या घाबरल्या पण राम-लक्ष्मणांना राक्षसाला पाहण्याची उत्सुकता वाटूं लागली. सर्वमाया आल्यावर परस्परांची खुशाली विचारून झाली. तेव्हां सर्वमायानें आपल्या येण्याचा हेतु उघड करून सांगितला.

"आपल्यापाशीं जें अयोनिज कन्यारत्न आहे त्यासाठीं राजाधिराज रावणानें मागणी घातली आहे." हा त्याचा निरोप ऐकून सीतेला वाईट वाटलें व उर्मिला गोंधळून गेली. रामाला त्यांत अनुचित असें कांहीं वाटलें नाहीं. त्याच्या दृष्टीनें कुमारिकेला मागणी घालण्याचा कोणालाहि हक्क होता आणि त्यांत रावण जगज्जेता व प्रत्यक्ष ब्रह्मदेवाचा पणतु. परंतु लक्ष्मणाला मात्र या निसर्गवैरी रावणाचें हें कृत्य उद्धटपणाचें वाटलें. विश्वामित्र आणि कुशध्वज सर्वमायाला उत्तर काय द्यावें या विचारांत पडले.

इतक्यांत जवळपास मोठी गडबड झालेली ऐकूं येऊं लागली. कुशध्वजाला वाटलें की यज्ञाकरितां येणाऱ्या पाहुणे मंडळींचीच ही गडबड असेल; पण प्रत्यक्ष जाऊन पाहातात तों एक भयंकर राक्षसी आश्रमाकडेच चालून येतांना दिसली. ती अक्राळविक्राळ राक्षसी ताटका आहे, असें सांगून विश्वामित्रांनीं रामाला आज्ञा केली कीं, हिला ठार मारून टाक. रामानें,स्त्रीवध कसा करावा अशी शंका काढली तेव्हां विश्वामित्र म्हणाले, "अरे, विचार कसला करतोस ! ब्राह्मणांचा संहार तुला दिसत नाहीं का ? चल, आटप लवकर." मग मात्र रामानें बरोबर वेध घेऊन आपल्या बाणानें त्या दुष्ट राक्षसीचें काळीजच तोडलें.

ताटकेसारखी भयंकर व बलाढ्य राक्षसी रामाच्या एकाच बाणानें मरून पडलेली पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. विश्वामित्रांच्या तोंडून उद्गार निघाले कीं, "हा दैत्यसंहाराचा प्रारंभच झाला म्हणावयाचा ! " आणि

तो प्रकार पाहून सर्वमाया राक्षसानें म्हटलें कीं, " राक्षस-राज रावणाच्या प्रतापाला ओहोटी लागली ! " कुशध्वजाला मात्र आतां आपल्या मनांतली इच्छा पुरी होणार असा विश्वास वाटूं लागला.

ताटकेचा वध झाल्यानंतर विश्वामित्रांनीं प्रसन्न होऊन रामाला अनेक अस्त्रें दिलीं. ब्रह्मादिक देवांनीं हजारों वर्षें तप करून मिळविलेल्या या अस्त्रांना जृंभकास्त्रें म्हणत. हीं अस्त्रें रामानें एकटयाा स्वतःसाठीं न स्वीकारतां तीं आपल्याबरोबरच लक्ष्मणालाहि प्राप्त होवोत असें विश्वामित्रांजवळून मागून घेतलें.

रामाला विश्वामित्रांकडून अस्त्रप्राप्ति झालेली पाहून कुशध्वजाची खात्रीच झाली कीं, राम शिवधनुष्याला दोरी लावण्याचा पण सहज जिंकील. म्हणून त्यानें विश्वामित्र-ऋषींची स्तुति करून त्यांना विनंती केली कीं, तुम्ही शंकराचे परमभक्त असल्यामुळें व त्यांची तुमच्यावर कृपा असल्यामुळें तुम्ही स्मरण करतांच जनकाकडील शिव-धनष्य येथें येईल. तरी तुम्ही तें आत्तांच येथें आणवा.

त्याप्रमाणें शिवधनुष्य सिद्धाश्रमांत आलें आणि रामानेंहि लीलेनें तें वांकवून मोडून टाकलें. तेव्हा लक्ष्मणाच्या तोंडून शब्द निघाले कीं, " रामाच्या हातून शिवधनुष्य मोडल्याचा कडकडाट हाच त्याच्या बालचरित्राच्या प्रस्तावनेचा डंका म्हणून त्रिभुवनांत गाजत आहे. "

हा कठीण पण रामानें जिंकल्यामुळें अर्थातच त्यानें

सीताहि जिंकली. इतका वेळ कांहींच निश्चित उत्तर न मिळाल्यामुळें ताटकळत राहिलेला सर्वमाया राक्षस हा सर्व प्रकार पाहातच होता. त्याच्या अंगाचा नुसता तिळपापड झाला. परंतु त्यावेळीं तरी हात चोळीत बसण्यापलीकडे त्याला कांहींच करतां येण्यासारखें नव्हतें. त्यानें रावणाच्या पराक्रमाचें वर्णन करून इंद्राच्या नगरांतील लोकांप्रमाणें बंदिवान होऊन लंकेंत येण्याची पाळी सीतेवर येईल अशी धमकीहि देण्यास कमी केलें नाहीं. परंतु त्याच्या त्या बोलण्याकडे कोणी लक्ष दिलें नाहीं.

रामाचा सीतेशीं विवाह ठरला त्याप्रमाणेंच उर्मिला लक्ष्मणाला दिल्याचें कुशध्वजानें सांगून टाकलें. कुशध्वजाच्या स्वतःच्या दोन मुली मांडवी व श्रुतकीर्ति या अनुक्रमें भरत व शत्रुघ्न यांना देण्याचें ठरलें. आणि त्याप्रमाणें विवाह समारंभासाठीं सर्व राण्यांना बरोबर घेऊन मिथिलेला येण्याचा निरोपहि दशरथाकडे गेला.

परंतु अद्यापि विश्वामित्रांचा यज्ञ पार पडावयाचा होता. त्याला विघ्न करण्यासाठीं सुबाहु व मारीच हे दोन राक्षस त्याचवेळीं आश्रमावर चालून आले. तेव्हां विश्वामित्रांनीं रामलक्ष्मणांना म्हटलें कीं, हे सुंदोपसुंदाचे मुलगे, रावणाचे अनुयायी सुबाहु व मारीच यज्ञ मोडण्यासाठीं आले आहेत. तेव्हां यज्ञाचें हें विघ्न ताबडतोब नाहींसें करून टाका.

सुबाहु आणि मारीच अगदीं आयत्या वेळीं आल्यामुळें, निराश झालेल्या सर्वमायालाहि धीर आला. परंतु राम-

लक्ष्मणांनीं सुबाहूला तर तत्काळ ठार मारला आणि मारीचाला पळतां भुई थोडी झाली !

२ ***

सर्वमाया राक्षसानें स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिलेला तो रामपराक्रम समक्षच जाऊन माल्यवानाला निवेदन केला. माल्यवान त्यामुळें मोठ्या काळजींत पडला. त्याच्या लक्षांत आलें कीं रावणाच्या प्रतापाला आतां उतरती कळा लागली आहे !

पुढें काय करावें या विचारांत तो असतांनाच शूर्पणखा त्याच्यापुढें येऊन नमस्कार करून उभी राहिली. माल्य-वानानें तिला काय बातमी आहे, म्हणून विचारल्यावरून तिनें जनक राजाकडील लग्नकार्य नुकतींच आटपलीं आणि अगस्ति ऋषींनीं रामाला माहेंद्रधनुष्य प्रसाद म्हणून दिलें या दोन गोष्टी सांगितल्या. तेव्हां या रामाचा प्रतिकार कसा करावयाचा याचा विचार त्या दोघांनीं चालविला. इतक्यांत महेंद्रद्वीपांत राहाणाऱ्या परशुरामाकडून एक महत्त्वाचें पत्र घेऊन दूत आला. त्यांत 'परमशिवोपासक' म्हणून रावणाचा गौरव करून लिहिलें होतें कीं, " दण्ड-कारण्यांतील तपस्व्यांना मीं अभय दिलेलें आहे. असें अस-तांना विराध, दनु, कबंध इत्यादि राक्षस त्यांना त्रास देत असल्याचें समजतें. तरी या गोष्टीचा ताबडतोब बंदोबस्त व्हावा. तरच हा जामदग्न्य तुमचा मित्र म्हणून राहील; नाहींतर तुम्ही जाणतांच ... "

माल्यवान परशुरामाची योग्यता जाणून होता आणि त्याच्याविषयीं त्याला आदरहि होता. त्यामुळें माल्यवानानें त्याचा निरोप धुडकावून न लावतां उलट शूर्पणखेसह त्याच्या भेटीसाठीं जाण्याचें ठरविलें. यांत माल्यवानाचा डाव होता. परशुराम हा शंकराचा परमभक्त व कडवा अभिमानी, क्षत्रियांचा भयंकर द्वेष्टा. तेव्हां क्षत्रियपुत्र रामानें शिवधनुष्य तोडून टाकल्याचें त्याला समजल्यास तो रामाला कधींच क्षमा करणार नाहीं, ही माल्यवानाची खात्री होती. माल्यवानानें या विशिष्ट परिस्थितीचा उपयोग आपल्या स्वार्थासाठीं करून घेण्याचें ठरविलें.कांट्यानें कांटा काढावा त्याप्रमाणें परशुरामाच्या हातून पराक्रमी रामाचा परस्पर नाश करावा असा त्याचा हेतु होता.आणि त्याप्रमाणें त्यानें महेंद्रद्वीपांत जाऊन परशुरामाला रामाविरुद्ध भडकविलेंहि.

परशुराम भयंकर संतापून मिथिला नगरींत आला. जनकाच्या राजवाड्यांतील विवाहसमारंभ आटोपले होते. परंतु अद्यापि विवाहकंकणें सुटलीं नव्हतीं. त्यामुळें राम अजून अंत:पुरांतच होता. परशुरामाला हें समजतांच तो रामाला आव्हान देत तडक अंत:पुरांतच घुसला. त्यामुळें तेथें एकदम गडबड उडून गेली. राम मात्र मुळींच घाबरला नव्हता. तो शान्तपणानें पण छाती ताठ करून रागावलेल्या परशुरामासमोर येऊन उभा राहिला. सीता काळजी आणि भीति यांनीं अगदीं चूर होऊन गेली. परंतु रामानें तिला धीर दिला कीं, “ तूंहि क्षत्रियकन्या आहेस. आणि त्या

जगद्विख्यात वीराच्या समोर जाण्यास हा क्षत्रिय राघवहि समर्थ आहे. तेव्हां भिऊं नकोस."

'मनोहर परंतु घोर रूप धारण केलेला प्रत्यक्ष अथर्वणवेदच' भासणाऱ्या परशुरामाची रामाशीं दृष्टादृष्ट होतांच रामाविषयीं परशुरामाच्या मनांत प्रेम व आदर उत्पन्न झाला. परंतु कांहीं झालें तरी आपल्या गुरूच्या–शंकराच्या अपमानाचा अपराध तो विसरावयास तयार नव्हता. इतक्यांत स्वतः जनक राजा व त्याचा पुरोहित शतानन्द हे दोघे परशुरामासमोर आले. जनकाच्या हातांत धनुष्यबाण होतीं आणि त्याचा निश्चय झालेला होता कीं, परशुराम रामाशीं-आपल्या जांवयाशीं-शत्रुत्व धरून आला असेल तर त्याचें स्वागत अर्ध्यपाद्यादिकांऐवजीं धनुष्य-बाणांनींच केलें पाहिजे. परंतु तो प्रसंग येण्यापूर्वींच विश्वामित्र-वसिष्ठांकडून त्या तिघांनाहि बोलावणें आल्यामुळें ते तिकडे गेले. आणि राम कंकण सोडण्यासाठीं म्हणून पुन्हा अंतःपुरांत परतला.

३ ***

राजा दशरथापाशीं सर्वजण जमले. वसिष्ठ व विश्वामित्र तेथेंच होते. जनक व शतानंद परशुरामासह तेथें आले. सर्वांनीं आपापल्यापरी परशुरामाची समजूत घालण्याची पराकाष्ठा केली.

'वृद्ध व जगन्मान्य राजा दशरथ आपल्या पुत्राविषयीं तुझ्यापाशीं अभय मागतो आहे' अशी वसिष्ठांनीं दशरथाच्या

वतीनें परशुरामाची प्रार्थना केली. ' हें शुष्क भांडण सोडून देऊन तूं आपल्या परशूचा उपसंहार कर ' असेंहि त्यांनीं त्याला विनविलें. विश्वामित्रांनीं त्याला म्हटलें, " गुरूचा (शंकराचा) अपमान झाला म्हणून त्याच्या अभिमानाची गोष्ट तूं बोलतोस तर मग आमचाहि कांहीं विचार कर कीं. वसिष्ठ, भृगु व अंगिरस हे तिघेहि ब्रह्मदेवापासून उत्पन्न झालेले. त्यांतले हे वसिष्ठ येथें आहेत, तूं तर भृगूचा मुलगाच आणि जनकाचा पुरोहित हा शतानंद अंगिरसाचा नातू. हें तुमचें नातें तरी लक्षांत घे. "

परंतु परशुराम केवळ हट्टाला पेटला होता. तो म्हणाला, " पूज्य व्यक्तींचें न ऐकल्याच्या दोषाबद्दल मी नंतर प्रायश्चित्त घेईन, परंतु शस्त्रग्रहणरूपी या महाव्रताचा मात्र मी कधींच भंग होऊं देणार नाहीं. मोक्षापेक्षां मान मला अधिक महत्त्वाचा आहे. "

या सर्वांमधील शाब्दिक वाद अगदीं विकोपाला गेला. शतानंद व परशुराम यांनीं तर एकमेकांना अपशब्द ऐकविले. शांतिब्रह्म वसिष्ठांचीहि शांति ढळते कीं काय असा प्रसंग आला. शेवटीं जनक व दशरथ यांनीं ठरविलें कीं, या उद्धट ब्राह्मणाचें पारिपत्य क्षत्रियबळानेंच केलें पाहिजे. तथापि त्यांना स्वतःला तें करणें शक्य नव्हतें. शेवटीं स्वतः राम अंतःपुरांतील विवाहाचे विधि उरकून बाहेर आल्यावर त्यानेंच तें काम पार पाडलें. राम-परशुरामांचें युद्ध होऊन रामानें परशुरामाचा सहज पराभव करून टाकला.

४ ***

रामाच्या हातून परशुरामाचाहि पराभव झाल्यामुळें देवादिकहि रामाची स्तुति करूं लागले. माल्यवानाचा डाव त्याच्यावरच उलटला. यामुळें शूर्पणखेला आतां राक्षसकुलाचें कसें होणार अशी काळजी वाटूं लागली. ती माल्यवानाबरोबर विमानांत बसून चालली होती. शूर्पणखेनें आपली चिंता बोलून दाखवितांच माल्यवानाच्या मनांत एक कल्पना आली. त्यानें लगेच एका भयंकर कारस्थानाचें जाळें टाकण्यास सुरुवात केली. शूर्पणखेलाहि त्यानें त्या कारस्थानांत सामील करून घेतलें.

राजा दशरथाची मधली राणी कैकयी हिला दशरथानें पूर्वी दोन वर देण्याचें वचन दिलें होतें. कैकयी ही भरताची आई. हिची मंथरा नांवाची दासी होती. ती अयोध्येहून मिथिलेला दशरथाकडील क्षेमकुशल समजून घेण्यासाठीं निघाली होती. ती मिथिलेच्या अगदीं जवळ जाऊन पोहोंचली होती. माल्यवानाला हें सर्व माहीत होतें. त्यानें या गोष्टीचा उपयोग आपल्या कारस्थानाकरितां करून घेण्याचें ठरवून शूर्पणखेला चटकन म्हटलें कीं, तूं अशीच जाऊन मंथरेच्या शरिरांत प्रवेश कर.

शूर्पणखेनें पुढें काय करावयाचें तेंहि माल्यवानानें हळूच तिच्या कानांत सांगितलें. या सर्व कारस्थानांत माल्यवानाचा मुख्यतः उद्देश रामाला कपटानें स्वजन व स्वदेश यांपासून दूर नेणें आणि राक्षसांचें प्राबल्य असलेल्या

विंध्यारण्यांत एकाकी गांठणें हा होता. यावेळीं दण्डकारण्यांत दनु, कबंध, विराध इत्यादि राक्षस यज्ञकर्त्या तपस्व्यांचा संहार करीत हिंडत होतेच. रामाबरोबर अशा घोर अरण्यांत सीताहि आल्यानें रावणाला तिला पळवून नेणें सोपें जाईल; आणि स्वतःची पत्नी शत्रूनें पळवून नेल्यामुळें राम कदाचित बेअब्रू झाल्यानें आत्महत्त्या करून घेईल किंवा निदान निर्माल्यवत् होऊन जाईल, असून नसून सारखाच होईल; नाहींतर सीतेच्या विरहानें शोकाकुल होऊन तह करावयास तयार होईल.—माल्यवानाचा हा तर्क होता. आणि या तर्काच्या आधारानेंच तो आपल्या कारस्थानाचें जाळें विणीत होता.

परंतु सीताहरणामुळें राम उलट संतापून राक्षसांचा नाश करण्यास उद्युक्त झाला तर मात्र मोठें कठीण होऊन बसेल याची कल्पना माल्यवानाला चांगली होती. म्हणून त्यानें त्याहि दृष्टीनें बंदोबस्त करण्याचें ठरविलें. किष्किंधेचा बलाढ्य राजा वाली रावणाचा मित्र होता. तेव्हां रामानें रावणाशीं वैर धरल्यास रामाचा कांटा परस्पर वालीकडून काढतां यावा, अशीहि व्यवस्था माल्यवानानें चालविली.

या सर्व भानगडी करून आज रामाशीं जें प्रत्यक्ष शत्रुत्व नाहीं तें कशाला ओढवून घ्यावयाचें अशी शंका यावर शूर्पणखेनें काढली. त्यावर माल्यवान म्हणाला कीं, आम्ही राक्षस आणि राम हे एकमेकांचे शत्रु हें ठरलेलेंच आहे. कारण राम धर्माचा रक्षक तर आम्ही मन मानेल तसें वागून धर्मरक्षकांचा छळ करणारे; तो क्षत्रिय आम्ही ब्राह्मण.

रामासारख्या प्रबळ शत्रूशीं वैर करावयाचें आणि त्याच्या नाशाचा विचार करावयाचा ही सोपी गोष्ट नाहीं, हें स्वत: माल्यवानहि जाणून होता. परंतु त्याचा भर मुख्यत: कपट-कारस्थानावर होता. तशा त्याला स्वत:च्या घरच्याहि अडचणी होत्या. त्याचा नातू व रावणाचा भाऊ बिभीषण हा 'घरांत बाळगलेल्या भयंकर सापासारखा शत्रु होऊन बसलेला.' त्याची भीति त्याला वाटत होतीच. त्याच्या सद्‌गुणांमुळें तो लंकेच्या प्रजाजनांचा आवडता होता. आणि खर, दुषणादिक राक्षस त्याचे अभिमानी होते. हे खर, दुषण व त्रिशिरा रावणाची सेवा करतांना दिसत होते, तरी खरें पाहिलें असतां वासरूं गाईचें दूध शोषून घेत असतें त्याप्रमाणें ते स्वत:साठीं पैसा कसा लाटतां येईल याच खटपटींत सदा असायचे. कुंभकर्ण सदा निजलेलाच, म्हणजे रावणाच्या दुष्टीनें त्याचा उपयोग, असून नसल्यासारखाच. असें हें रावणाचें राजकुल आंतून पुरें पोखरलेलें व जीर्ण झालेलें होतें. त्यावर जर का रामानें आपल्या सर्व शक्तीनिशीं प्रहार केला तर त्याचा सर्वनाश हा ठेवलेलाच.—या सर्व गोष्टींचा विचार माल्यवानानें मोठ्या मुत्सद्दीपणानें चालविला होता.

शेवटीं त्यानें आपल्या मनाशीं कांहीं विचार पक्का केला. प्रथम खर-दुषणादिकांचा रामाच्या हातून फडशा पाडावा. मग हरप्रयत्नानें बिभीषण रावणाच्या राजधानींतून निघून जाईल असें करावें. बिभीषण लंकेंतून बाहेर पडला कीं, त्याचा मित्र सुग्रीव ऋष्यमूक पर्वतावर राहात आहे तेथें अवश्य जाईल. मग तो सुग्रीवाचा बलाढ्य भाऊ

वाली म्हणून आहे त्याच्या मदतीनें आपलें काम करून घेण्याचा प्रयत्न करील; तो रामाच्या आश्रयाला जाणार नाहीं. कारण तो रामाकडे गेलेला वालीला मुळींच खपणार नाहीं.

'–परंतु ज्या रामानें परशुरामाला नमविला त्यानें वालीलाच नाहींसा केला तर राम आणि बिभीषण आय-तेच एक होतील आणि मग साराच अनर्थ कोसळेल.' माल्यवानाच्या विचारांत शूर्पणखेंनें वाढलेली ही शंका बिनतोड होती. परंतु त्यावर माल्यवानानें केलेलें तिचें समाधानहि तितकेंच विलक्षण होतें. माल्यवान म्हणाला, " वत्से, जो वालीचा वध करील त्याच्या हातून आम्ही कोणीच जिवंत सुटत नाहीं, अशी खूणगांठ बांधून ठेव. त्या सर्वनाशांत कुळाचें नांव पुढें चालविण्यासाठीं म्हणून तरी बिभीषण शिल्लक उरेल. तसें झालें तर धर्ममूर्ति रामाकडून त्याला राज्य व ऐश्वर्य प्राप्त होवो म्हणजे झालें."

इतकें बोलणें झाल्यावर शूर्पणखा नाइलाजानें मिथिले-कडे जावयास निघाली. माल्यवानानें तिला सूचना देऊन ठेवली होती कीं, वसिष्ठ-विश्वामित्र हे जनक-दशरथां-पासून दूर गेलेले असतील अशा वेळींच तूं आपलें काम करून घे. आणि तिला तशी संधी लगेच मिळाली.

रामानें परशुरामाचा पराभव केल्यानंतर ते दोघेहि राजसभेंत आले. तेथें वसिष्ठ, विश्वामित्र, जनक, दशरथ इत्यादि मंडळी बसलेली होती.

विद्या व तप यांनीं श्रेष्ठ असलेल्या परशुरामाचा दैवगतीमुळें आपल्या हातून मानभंग झाला, याबद्दल रामानें थोर अंतःकरणानें त्याची क्षमा मागितली. उलट परशुरामानें म्हटले कीं, तूं माझ्या शरिरांतील गर्वरूपी रोग नाहींसा करून टाकलास हे खरोखरी तुझे माझ्यावर मोठे उपकारच आहेत.

परशुरामानें वसिष्ठांना नमस्कार करून सर्वांची क्षमा मागितली व आपल्या उद्धटपणाबद्दल प्रायश्चित्त कोणतें असा प्रश्न केला. त्यावर वसिष्ठांनीं सांगितलें कीं, तूं सुधारलास यांतच आम्हांला आनंद आहे. तूं विनयी झाल्यामुळें तूं शुद्धच आहेस. दशरथानेंहि म्हटलें कीं, तीर्थोदक व अग्नि यांना दुसरें काय पवित्र करणार ! परशुरामा, तूं स्वतःच पवित्र आहेस, तुला त्यासाठीं प्रायश्चित्ताची गरज नाहीं.

या संभाषणानंतर परशुराम, विश्वामित्र व वसिष्ठ आपापल्या स्थानीं निघून गेले. वसिष्ठ–विश्वामित्रांनीं जाण्यापूर्वीं सीतेला आशीर्वाद दिला कीं, " सर्व क्षत्रियांत श्रेष्ठ अशा वीराची तूं पत्नी होशील." परशुरामानेंहि तेथून जाण्यापूर्वीं आपलें धनुष्य रामाच्या स्वाधीन करून त्याला आज्ञा केली कीं, दण्डकारण्यांतील ऋषिजनांचें राक्षसांपासून रक्षण कर.

परशुरामाला पोहोंचवून राम परत येत असतां त्याच्या मनांत परशुरामाच्या या आदेशाचाच विचार चालला होता. आतां परशुरामानें शस्त्र टाकून दिलें आणि आपण

तर इकडे दूर राहिलों. तेव्हां दण्डकारण्यांतल्या त्या ऋषींचें व तापसांचें काय झालें असेल. उघड्या पडलेल्या त्या बिचाऱ्यांचा राक्षस अगदीं फन्ना करीत असतील ! आपल्याला त्यांच्या रक्षणासाठीं दण्डकारण्यांत कसें जातां येईल या विचारांत राम गढून गेला असतांनाच लक्ष्मणाची हांक त्याच्या कानीं पडली. त्यानें सांगितलें कीं, अयोध्येहून मधली आई कैकयी हिच्याकडून कांहीं निरोप घेऊन मंथरा आली आहे.

ती मंथरारूपी शूर्पणखा रामाला पाहातांच त्याच्या रूपावर भाळली. परंतु तिला आपलें काम साधून घ्यावयाचें होतें. म्हणून तिनें साळसूदपणें पुढें येऊन सांगितलें कीं, पूर्वीं दशरथ महाराजांनीं कैकयी महाराणींना दोन वर दिले होते. ते त्यांना आतां मागून घ्यावयाचे आहेत. आणि त्यांच्याकरितां म्हणून तुम्हीच ते दशरथ महाराजांकडून मागून घ्यावेत असा आपल्या मधल्या मातेचा आपल्याला निरोप आहे. यासंबंधीं कैकयीनें दशरथासाठीं म्हणून लिहिलेलें पत्रहि मंथरेनें रामाला देण्यासाठीं पुढें केलें. लक्ष्मणानें चटकन पुढें होऊन तें आपल्या हातीं घेऊन वाचावयास सुरुवात केली. त्यांत लिहिलें होतें :

‘ एका वरानें भरताला राज्याचा अधिकार प्राप्त व्हावा आणि दुसऱ्यानें रामाला ताबडतोब दण्डकारण्यांत घालवून द्यावें. तेथें त्यानें वल्कलें नेसून चौदा वर्षें राहावें आणि त्या वेळीं तेथें त्याच्याबरोबर सीता व लक्ष्मण यांच्याशिवाय कोणीहि असूं नये. ’

पत्र वाचून होतांच लक्ष्मण संतापानें नुसता खवळून उठला. रामानें मात्र त्याबद्दल आनंद प्रकट केला. आपण दण्डकारण्यांत जावयाला उत्सुक असतांनाच मातेची ही आज्ञा झाली आणि त्यांतहि सीता व लक्ष्मण हीं दोघेंहि प्रिय माणसें बरोबर राहाण्याची परवानगी मिळाली, तेव्हां आपल्यावर कैकयीची ही मोठी कृपाच झाली असें तो म्हणाला. त्यानें लगेच वनांत जाण्याची तयारीहि केली. तें पाहून मंथरेच्या वेषांतील शूर्पणखेला मोठें आश्चर्य वाटलें आणि रामाबद्दल आदरहि उत्पन्न झाला.

इकडे याच वेळीं भरत व त्याचा मामा युधाजित दशरथापाशीं आले व त्यांनी राजाला विनंती केली कीं, रामाला अधिराजपद प्राप्त व्हावें अशी प्रजेची इच्छा आहे. ती विनंती ऐकून दशरथानें जनकाच्या संमतीनें रामाला अभिषेक करण्याचें ठरविलें व त्याची तयारी करण्याविषयीं सुमंत्राला आज्ञा दिली.

परंतु तेवढ्यांत रामानें पुढें होऊन कैकयीचा निरोप दशरथाला निवेदन केला आणि मग एकदम सर्वत्र हाहाःकार उडाला. भरताचा मामा युधाजित यानें रामाला वनांत न जाऊं देण्याबद्दल खूप प्रयत्न केला परंतु रामानें त्या बाबतींत कोणाचेंहि ऐकलें नाहीं.भरताच्या आग्रहामुळें त्यानें आपल्या पायांतील सुवर्णपादुका मात्र भरताच्या स्वाधीन केल्या. त्या पादुका घेऊन नंदिग्रामांत तपस्वी वृत्तीनें राहून राज्य चालविण्याचें भरतानें मोठ्या कष्टानें कबूल केलें. अखेर रामानें लक्ष्मण व सीता यांच्यासह चित्रकूट पर्वताकडे प्रयाण केलें.

५ . . .

शृंगवेरपुराचा निषाद राजा गुह याच्या प्रदेशांत विरोध राक्षसानें धुमाकूळ मांडला होता. तेव्हां त्याचा समाचार घेण्याकरितां राम-लक्ष्मण प्रथम तिकडे वळले. विराधाचा वध करून ते चित्रकूटाहून शरभंगाच्या आश्रमाकडे आले. शरभंगानें अग्नींत प्रवेश करून आपलें जीवन संपविल्यानंतर रामानें सुतीक्ष्णादि मुनींचीं दर्शनें घेतलीं. तेथून पुढें दण्डकारण्यांत प्रवेश करून त्यानें राक्षसांचा संहार करण्याचा उद्योग हातीं घेतला. आणि दण्डकारण्यांतील तपस्व्यांचें रक्षण होऊं लागल्यावर हळूहळू ते जनस्थानाकडे आले. जनस्थानाजवळच जटायू गृध्रराज राहात होता. हा दशरथाचा मोठा मित्र होता. जनस्थानांत आल्यावर अगस्ती मुनींच्या आग्रहावरून राम, सीता व लक्ष्मण आश्रम करून गोदावरी नदीच्या कांठीं पंचवटींत राहूं लागलीं. तेथें एकदा शूर्पणखा सुंदर रूप धारण करून रामाला भुरळ पाडण्याकरितां गेली असतां लक्ष्मणानें तिचे नाक, कान कापून तिला हांकलून दिलें.

राम जनस्थानांत असतांनाच खर, दुषण व त्रिशिरा हे रावणकुलांतील तीन प्रख्यात राक्षस त्यानें ठार मारले आणि त्यांच्याबरोबर असलेल्या इतर चौदा हजार राक्षसांनाहि त्यानें यमसदनाला पाठविलें. अशा रीतीनें आपल्या सख्ख्या बहिणीची विटंबना झाली आणि नात्यागोत्यांतील अनेक स्वकीयांचा फडशा पडला हें रावणाला

सहन होणें शक्यच नव्हतें. एकतऱ्हेनें राम-रावणां-मधील वैराचें हें मोठें द्वारच उघडलें गेलें !

जटायू जनस्थानाच्या जवळपासच राहात असल्यामुळें त्याला साहजिकच या गोष्टी समजत होत्या. एकदां तो मलय पर्वतावर राहाणाऱ्या आपल्या भावाला–संपातीला भेटण्यासाठीं गेला असतांना त्यानें संपातीला ही सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून संपातीला मोठी काळजी वाटूं लागली, कारण तोहि रघुकुलाचा स्नेही होता. त्यानें जटायूला लगेच सूचना दिली कीं, "त्या तिघांना सोडून यापुढें तूं कधींहि दूर जाऊं नकोस. आपल्याला या मुलांचें रक्षण अवश्य केलें पाहिजे."

संपातीच्या सूचनेमुळें जटायू जनस्थानाकडे तांतडीनें परत आला, परंतु जें अनिष्ट घडावयाचें तें घडावयास सुरुवातहि झाली होती. तो गोदावरीच्या उगमाजवळील प्रस्रवण पर्वताजवळ येतांच त्याला पंचवटींतील दृश्य दिसूं लागलें. राम हातीं धनुष्यबाण घेऊन एका विचित्र हरणाच्या मागें लागला असून लक्ष्मणहि त्याच्या साहाय्यासाठीं पंचवटींतील आश्रमापासून दूर गेला आहे. पंचवटींत एकटी सीताच असून संन्यासाचा वेष घेतलेला रावण पंचवटींत प्रवेश करीत आहे. एवढें होत आहे तोंच रावणानें सीतेला पकडून रथांत घातलें आणि त्यानें वेगानें रथ हांकला. तो सगळा प्रकार पाहून जटायूला आश्चर्य तर वाटलेंच पण लागलाच संतापानें तो पुढें धांवला. आतां त्याच्याच्यानें स्वस्थ पाहात बसणें शक्य नव्हतें. त्यानें प्रथम रावणाला त्याच्या तपाची व कुलाची आठवण देऊन

असल्या दुष्ट कृत्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु तो त्याकडे लक्ष देत नाहीं असें पाहून तो त्याच्यावर भयंकर वेगानें तुटून पडला. परंतु त्यांत जटायूला मृत्युमुखीं पडावें लागलें.

राम व लक्ष्मण परत येऊन पाहातात तों आश्रमांतून सीता नाहींशी झाल्याचें त्यांना दिसून आलें. अर्थातच त्यामुळें त्यांना अतोनात दुःख झालें.ते तिचा शोध करण्यासाठीं आसपास हिंडू लागले, तेव्हां मरणोन्मुख झालेला जटायू त्यांना भेटला. त्यानें मरतां मरतां इतकेंच सांगितलें कीं, " सीता व माझे प्राण दोन्ही त्या रावणानेंच हरण करून नेलीं. "

वास्तविक राक्षसांच्या यापूर्वींच्या वर्तनावरूनच ते रामाचे शत्रु बनलेले होते. आणि त्यांच्या त्या अघोरी वर्तनामुळें रामानें त्यांचा नाश करण्याचें याअगोदरच मनाशीं ठरविलेलें होतें. परंतु आतां तर प्रत्यक्ष त्याची पत्नीच राक्षसराज रावणानें पळवून नेली होती. त्यामुळें सागरांतील भडकलेल्या वडवानळाप्रमाणें रागावलेल्या रामानें अशी प्रतिज्ञा केली कीं, " केवळ रावणाच्याच नव्हे तर सबंध रावणाच्या कुळाचाच संहार करून मी त्याला या त्याच्या दुष्कृत्याचें प्रायश्चित्त देईन."

सीतेचा शोध करीत ते दोघे जनस्थानाच्या पश्चिमेस असलेल्या दण्डकारण्यांतील कुंजवान नांवाच्या प्रदेशाकडे आले. तेथें दनु—कबंध इत्यादि राक्षसांनीं धुमाकूळ माजविला होता. ‘ त्या दुष्टाशीं गांठ घातलीच पाहिजे ’ असें म्हणत राम त्या प्रदेशांतून जात आहे तोंच त्याच्या काना-

वर ‘ धांवा, सोडवा ’ अशा किंकाळ्या पडल्या. तत्काळ लक्ष्मण त्या बाजूला धांवून गेला. थोड्या वेळानें लक्ष्मण आपल्याबरोबर एका भिल्लीण तापसीला घेऊन रामापाशीं परत आला. दनु–कबंध राक्षस तिला ओढीत नेत होता आणि त्यामुळेंच तिनें मदतीसाठीं धांवा चालविला होता. लक्ष्मणानें त्या राक्षसाला मारून तिला सोडवून आणलें आणि रामापाशीं आणून उभें केलें. वास्तविक ती रामाचाच शोध करीत त्या बाजूला आली होती. म्हणून तिनें रामाला समोर पाहातांच आपल्या येण्याचा उद्देश सांगितला. खर, दुषणादिक राक्षस रामाच्या हातून मारले गेल्यानंतर बिभीषण लंका सोडून आपला लहानपणापासूनचा मित्र सुग्रीव याच्यापाशीं ऋष्यमूक पर्वतावर येऊन राहिला होता. आणि त्याचें एक पत्र घेऊनच ही श्रमणा नांवाची शबरी तें रामाला देण्यासाठीं आली होती. बिभीषणानें त्या पत्रांत रामापाशीं स्नेहाची व रक्षणाची याचना केली होती. रामानेंहि लगेच त्याचा “प्रियमित्र लंकेश्वर” असा गौरव करून त्याला लंकेच्या राज्यावर बसविण्याचें अभिवचन लक्ष्मणापाशीं बोलून दाखविलें.

त्यानंतर शबरीकडून रामाला कळलें कीं, रावण सीतेला पळवून नेत असतां तिच्या अंगावरील शेला खालीं पडला तो ऋष्यमूक पर्वतावर राहाणाऱ्या सुग्रीव, हनुमान, बिभी-षण इत्यादिकांनीं स्वतःजवळ ठेवून दिला आहे. ते सर्व रामाच्या गुणांचे चाहते आहेत. हें कळल्यावर तो लक्ष्मणासह शबरीला वाटाडी करून ऋष्यमूक पर्वताकडे निघाला. तीं तिघें पुढें निघालीं तों रामाचें लक्ष एका पेटलेल्या

मोठ्या चितेकडे गेलें. लक्ष्मणाच्या हातून ठार झालेल्या दनु–कबंधाचीच ती चिता होती. त्या चितेंतून एक दिव्य पुरुष उत्पन्न झाला आणि रामाला नमस्कार करून म्हणाला कीं, मी शापामुळें राक्षस झालों होतों पण आतां आपल्या प्रभावामुळें मुक्त झालों आहें. या उपकाराची फेड म्हणून तुम्हांला एक गुप्त गोष्ट सांगतों. माल्यवानानें वालीकडे तुमच्या वधाची कामगिरी दिलेली असून रावणाच्या मैत्रीमुळें वालीनें ती पत्करली आहे. रामाला ही एक महत्त्वाचीच गोष्ट समजली.

ऋष्यमूक पर्वत व पंपा सरोवर यांच्या जवळपास असलेल्या मतंगाश्रमापाशीं राम लक्ष्मण व शबरी यांच्यासह येतो तोंच स्वत: वाली रामाला शोधीत तेथें आला.त्याला रामाबद्दल फार आदर वाटत होता, परंतु माल्यवानाच्या आग्रहाला बळी पडून केवळ मित्रधर्मासाठीं तो रामाशीं युद्ध करण्याचें पाप करण्यास तयार झाला होता. त्या वेळपर्यंत त्याला शबरी रामाकडे गेल्याचें व रामानें बिभीषणाला लंकेच्या राज्यावर बसविण्याचें वचन दिलें असल्याचेंहि कळलें होतें.

रामाची भेट होतांच वालीनें प्रथम त्याचा गौरव करून मग त्याला युद्धाचें आव्हान दिलें. दोघांची लढाई होऊन रामानें वालीला भयंकर जखमी करून जमिनीवर पाडलें. लढाईची ही गडबड ऐकून ऋष्यमूक पर्वतावरून सुग्रीव, हनुमान, नीळ इत्यादि वानर आणि बिभीषणहि तेथें येऊन ठेपले होते. वालीनें प्राण सोडण्यापूर्वी सुग्रीव व बिभीषण यांच्याशीं राम-लक्ष्मणांचें सख्य करून दिलें आणि रामाला

सीताशोधासाठीं सर्वतोपरी साहाय्य करण्याची आज्ञा वानर-वीरांना केली. ' आपण स्वतःच रामाकडून पराभूत झालों असल्यामुळें आतां रावणाचाहि ग्रंथ आटोपला, ' असेंच त्यानें बिभीषणाला सुचविलें. अखेर त्यानें सर्व वानरवीरांना रामाच्या बाजूनें युद्ध करण्याविषयीं उत्साह देऊन स्वतःचें जीवन संपविलें.

६ * * *

माल्यवानाचा प्रत्येक डाव त्याच्यावर उलटत होता. वालीच्या हातून राम नाहींसा होण्याऐवजीं रामाच्याच हातून वाली नष्ट झाला ; इतकेंच नव्हे तर रामाला बिभीषण व सुग्रीव यांचें साहाय्यहि मिळालें. मोठमोठे वानरवीर निरनिराळ्या दिशांना सीतेच्या शोधासाठीं निघाले. त्यांपैकीं दक्षिणेकडे गेलेल्या हनुमानानें लंकेलाच आग लावून दिली आणि वानरांच्या शक्तीची चुणूक माल्यवानाला दाखविली. माल्यवान समजून चुकला कीं, रावणानें लावलेल्या दुर्वर्तनरूपी वृक्षाला आतां फळें येऊं लागलीं आहेत !

हनुमानानें लावलेल्या आगींत अर्धी लंका जळाली व आग त्रिकूट पर्वतापर्यंत पोहोंचली. कुमार अक्षाला त्यानें ठार मारलें. यःकश्चित मानव म्हणून लंकेंतील राक्षस पुढाऱ्यांनीं दुर्लक्षिलेला राम समुद्रावर सेतु बांधून प्रत्यक्ष लंकेवर चालून आला. सुवेळा पर्वतापाशीं आपल्याबरोबरचें वानरादिकांचें प्रचंड सैन्य ठेवून स्वतः राम थोड्याशा वीरांसह पुढें चालून आला. हें पाहून रावणाचा सेनापति प्रहस्त यानें नगराच्या वेशीचे दरवाजे लावून घेतले आणि

सर्वत्र बंदोबस्त करून टाकला. तथापि रामानें लंकेला वेढा दिल्याचें समजल्यामुळें लंकावासी जनतेंत एकच हलकल्लोळ उडाला. हनुमानाच्या पराक्रमानें ती अगोदर घाबरून गेलीच होती, त्यांत ही नवी बातमी आली होती.

प्रहस्तानें जाऊन सर्व परिस्थिति रावणाला सांगितली. तरी त्याला त्यांत कांहीं विशेष वाटलें नाहीं. वानरें नि माणसें आपलें काय वांकडें करणार या भ्रमांतच तो होता. इतक्यांत रामाकडून अंगद दूत म्हणून रावणाकडे आला. त्यानें रावणाला रामाचा निरोप कळविला कीं, " सीतेला परत कर, आणि इष्टमित्रांसह रामाला शरण ये. नाहींपेक्षां रामाच्या बाणांनीं तुमचा सर्वांचा नाश केला जाईल." परंतु रावणानें त्या रामदूतालाच शिक्षा करण्याचा विचार केला ; तेव्हां अंगद तेथून निसटून परत गेला. रावणानें प्रहस्ताला लगेच आज्ञा दिली कीं, वेशीचे दरवाजे उघडून शत्रूचा निःपात करून टाका. प्रहस्त ती आज्ञा घेऊन निघून जातो तोंच पुन्हा आरडाओरड झालेली ऐकूं आली. वानरवीरांनीं राक्षसांचे मोठमोठे पुढारी मारून टाकले होते आणि नगरावर चालून येणाऱ्या वानरसैन्यानें राक्षस-सेनेची अगदीं धुळधाण आरंभिली होती.

बाहेरचा एकंदर प्रकार आवाक्याबाहेर जात असलेला पाहून रावण अखेर स्वतःच युद्धासाठीं बाहेर पडला. राम–रावणांचें तें भयंकर युद्ध पाहाण्यासाठीं इंद्रादिक देवांनीं आकाशांत गर्दी केली. कुबेराकडून चित्ररथ गंधर्वहि माहिती मिळविण्यासाठीं तेथें येऊन पोहोंचला.

रामाच्या चढाईचा विशेष जोर पाहून स्वतः रावण

हजारों राक्षस, आपले शक्तिशाली व शूर भाऊ आणि मुलगे या सर्वांना घेऊन एकदम वेशीबाहेर आला. त्याला पाहून सुरुवातीला वानर थोडे भ्याले व मागें सरले. परंतु नंतर मात्र त्यांनीं भयंकर लढाई करून राक्षसांचा फडशा पाडला.

रावण पर्वताच्या शिखराप्रमाणें असलेल्या आपल्या प्रचंड रथावर बसून युद्ध करीत होता आणि राम मात्र पायींच लढत होता. तें पाहून इंद्रानें आपला स्वतःचा लढाईचा रथ आपला सारथी मातली याच्याबरोबर रामाकडे पाठवून दिला.

हळुहळु लढाईला भयंकर स्वरूप प्राप्त होऊन उभय पक्षांकडील सैनिकांच्या प्रेतांनीं रणभूमि भरून गेली. रावणाचे बहुतेक मुलगे आणि कुंभकर्णादि भाऊहि कामीं आले. शेवटीं स्वतः रावण व त्याचा मुलगा मेघनाद हे दोघेच शिल्लक उरले. राम रावणाशीं व लक्ष्मण मेघनादाशीं भिडला. शेवटीं राम-लक्ष्मणांनीं आपापल्या बाणावर ब्रह्मास्त्र योजून त्या दोघांहि राक्षसवीरांचीं शिरें धडापासून वेगळीं केलीं. रावणाचा वध झाल्यामुळें स्वर्गांत व पृथ्वीवर सर्वत्र आनंद झाला. आकाशांतून देवांनीं रामावर पुष्पवृष्टि केली. देव व ऋषि आनंदोत्सवाच्या तयारींत असल्यानें इंद्र स्वर्गांत निघून गेला आणि चित्ररथहि ही आनंदाची बातमी सांगण्यासाठीं कुबेराकडे अलका नगरीला गेला.

७ * * *

अशा रीतीनें राक्षसकुळाचा संहार झाल्यामुळें लंका-पुरीची देवता लंका हिला अतिशय दुःख झालें. रावणाचा

सर्वनाश झाला, त्याच्या कुळांत बिभीषणाशिवाय एकहि पुरुष उरला नाहीं आणि बिभीषणहि शत्रुपक्षाला मिळाला म्हणून ती शोक करूं लागली. इतक्यांत रावणाचा भाऊ कुबेर याची जी अलका राजधानी तिची देवता अलका तेथें आली आणि लंकेचें सांत्वन करूं लागली. ती म्हणाली, " राम कांही आपला शत्रु नव्हे. तो ज्याचा शत्रु तो या लोकांतून निघून गेला. राम वास्तविक निसर्गमित्र, पण राक्षसराज रावणानें त्याच्याशीं केलेल्या वर्तनाचें त्याच्याकडून त्याला योग्य प्रायश्चित्त मिळालें इतकेंच! गंधर्वराज चित्ररथानें येथील सगळा वृत्तान्त कुबेराला सांगितला आणि आतां कुबेराच्याच सांगण्यावरून मी येथें आल्यें आहें. उरलेल्या बांधवांचें सांत्वन करावें, बिभीषणाचा राज्याभिषेक समक्ष पाहावा आणि रावणाकडे असलेलें कुबेराचें पुष्पक विमान रामाला द्यावें हीं तीन कामें माझ्याकडे आहेत."

त्या दोघींचें हें बोलणें होत आहे तोंच आकाशवाणी झाली कीं, " अग्निदिव्यानें सीता शुद्ध झालेली असून रामानें तिचा स्वीकार करावा."

बिभीषणाचा राज्याभिषेक पार पडल्यानंतर बिभीषणहि पुष्पक विमान घेऊन रामाकडे आला. राम लक्ष्मण व सीता यांच्यासह बसला होता आणि सुग्रीव व हनुमान त्याच्या पाठीशीं उभे होते. बिभीषणानें नम्रपणानें पुढें यऊन सांगितलें कीं, आपल्या आज्ञेप्रमाणें मातलीला सत्कार करून परत पाठविलें. कैदेंत असलेल्या स्वर्गांतल्या स्त्रियांना मुक्त केलें. सारीं कारागृहें मोकळीं केलीं.

सीतेच्या अपमानाचा सूड रामानें पुरेपूर घेतल्याबद्दल सुग्रीवानें रामाचें मनःपूर्वक अभिनंदन केलें आणि रामाला विनंती केली कीं, हें सर्व शुभवर्तमान कळविण्यासाठीं हनुमानाला भरताकडे पुढें पाठवावें. त्याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर स्वतः राम, लक्ष्मण व सीता आपल्या सर्व साहाय्यकांसह पुष्पक विमानांत बसून अयोध्येकडे परत जावयास निघालीं. चौदा वर्षांचा वनवास पुरा व्हावयास फक्त एकच दिवस आतां बाकी राहिलेला होता.

विमान हळुहळु सागर ओलांडून उत्तरेच्या दिशेनें मलय पर्वताकडे आलें. तेथून कावेरी नदीचा आसमंत, अगस्ति ऋषींचा आश्रम, पंपा सरोवर, चित्रकूट पर्वत, दण्डकारण्य, सह्य पर्वत या मार्गानें अयोध्येकडे तें जाऊं लागलें. या सर्व प्र देशांत वनवासांत असतांना ज्या अनेक सुखदुःखाच्या घटना घडल्या होत्या त्यांच्या आठवणी काढीत राम, लक्ष्मण व सीता बोलत होतीं. वाटेंत त्यांना ऋषिमुनींकडून आशीर्वाद मिळाले. किन्नरांनीं त्यांची स्तुति केली. गंधमादन पर्वत ओलांडून गंगेच्या परिसरांत गेल्यावर भरत सैन्यासह आपल्या भेटीसाठीं येत आहे असें पाहून सर्वजण खालीं उतरले. सर्वांच्या प्रेमानें गांठीभेटी झाल्या. नवीनांचे शिष्टाचाराप्रमाणें परिचय करून देण्यांत आले.

रामाच्या राज्याभिषेकाची तयारी सर्व झालीच होती. थोडयाच वेळांत कुलगुरु वसिष्ठ आपली पत्नी अरुंधति आणि दशरथाच्या तिन्ही राण्या यांच्यासह तेथें येऊन पोहोंचला. मुलगे व सून सुखरूप परत आल्याबद्दल कौसल्या व सुमित्रा यांना मनापासून आनंद झाला व सुख वाटलें.

परंतु कैकयी मात्र खिन्न दिसत होती. तें पाहून अरुंधतीनें तिचें समाधान करीत म्हटलें कीं, तूं मंथरेच्या तोंडून या मुलांना वनवासाला पाठविलेंस असें वाटून खिन्न होऊं नकोस. यांतला खरा प्रकार मीं अंतर्ज्ञानानें केव्हांच जाणलेला आहे; आणि त्यांत तुझा कांहीं दोष नाहीं. हें सारें माल्यवानाचें कारस्थान. त्याच्याच शिकवणीनें, मंथरेच्या रूपानें शूर्पणखेनें हें सगळें घडवून आणलें होतें. अरुंधतीनें केलेला हा गौप्यस्फोट ऐकून सर्वांनाच आश्चर्य वाटलें व समाधानहि झालें.

रामाविषयीं कौशिक विश्वामित्रांना पहिल्यापासूनच मोठें प्रेम होतें. त्यामुळें स्वतः विश्वामित्र आपल्या शिष्यांसह त्याच्या राज्याभिषेकासाठीं येऊन उपस्थित झाले. ते म्हणाले, " यावेळीं मला अतिशय आनंद होतो आहे. कारण यज्ञांतील विघ्नें नाहींशीं करण्यासाठीं मीं या राम–लक्ष्मणांना दशरथापासून मागून आणलें तेव्हांपासून मी जें जें मनांत इच्छिलें होतें व ज्याच्यासाठीं मी सदैव काळजी करीत होतों तें सर्व उत्तम प्रकारें सिद्धीला गेलें आहे. आणि आज आतां माझ्या हातून श्रीरामाला राज्याभिषेक होऊन त्याची सांगता होत आहे. "

पुढें विश्वामित्र ऋषींच्या सांगण्यावरून रामानें बिभीषणादिकांचा सन्मान करून त्यांना आपापल्या जागीं परत पाठवून दिलें. तसेंच विश्वामित्र म्हणाले कीं, हें पुष्पक विमान तुला पाहिजे असेल तेव्हां तुझ्या सेवेला हजर राहील; त्यालाहि आतां कुबेराकडे परत पाठवून दे. रामानें त्याप्रमाणें केलें.

• • •

संस्कृत साहित्य सरितेचीं पुस्तकें

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित : भाग १
११. दशकुमारचरित : भाग २
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. उरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय

प्रत्येकीं किंमत ६ आणे

६ आणे

वोरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि०

